**स. फौ. ख. क्र. ४५५/२०१९**
**शासन वि. गणपत राणे.**
नि.क्र.

**<u>रोहा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांच्या न्यायालयात</u>**

**दोषारोप**

मी एस. एस. महाले, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड तुमच्यावर

गणपत मऱ्या राणे,
वय ५२ वर्षे,
रा. पाटणसई आदिवासीवाडी,
पो. पाटणसई, ता. रोहा, जि. रायगड.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो –

तुम्ही दिनांक ०१.०७.२०१९ रोजी संध्याकाळी ०७.३० वा. चे सुमारास मौजे बाळसई, वाकण–आमडोशी रोडवर, ता. रोहा येथे तुमच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ०६ बी वाय ९१४२ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **२७९** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरून चालत जाणारे इसम श्री. अनंत नारायण जाधव याला पाठीमागून ठोकर मारून अपघात करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत झालात, जो सदोष मनुष्यवध नाही व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३०४(अ)** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरून चालत जाणारे इसम श्री. अनंत नारायण जाधव याला पाठीमागून ठोकर मारून त्याला साध्या स्वरुपाच्या

दुखापती पोहचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३३७** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरून चालत जाणारे इसम श्री. अनंत नारायण जाधव याला पाठीमागून ठोकर मारून त्याला गंभीर स्वरुपाच्या दुखापती पोहचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३३८** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हयगयीने व सार्वजनीक जीवित धोक्यात येईल अशारितीने तसेच रस्त्याच्या परिस्थिकडे व वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.05.29 18:36:26 +0530

(एस. एस. महाले)
दिनांक २९.०५.२०२३. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीला उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

मोहोर

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.05.29 18:36:31 +0530

(एस. एस. महाले)
दिनांक २९.०५.२०२३. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.